जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ४९६ दिनांक - २६/११/२०२४**

दरोडा व वाहनचोरी विरोधी पथक १, गुन्हे शाखा,पुणे शहर

## रेकॉर्डवरील सराईत तडीपार गुन्हेगारास केले जेरबंद

दरोडा व वाहनचोरी विरोधी पथकाकडील अंमलदार हे हद्दीत पेट्रोलींग करीत असताना **पोलीस अंमलदार अमित गद्रे** यांना पुणे शहर पोलीस आयुक्तालयाचे गुन्हे अभिलेखावरील व मा. पोलीस उप आयुक्त परिमंडळ ४ यांनी तडीपार केलेला आरोपी नामे **गौरव संभाजी काकडे, वय-३२ वर्षे,रा.सोमेश्वर वाडी, विठ्ठल मंदीराशेजारी, पाषाण, पुणे** हा त्याचे रहाते घराजवळ येणार असले बाबतची खात्रीशीर बातमी प्राप्त झाल्याने सदरची बातमी मा. वपोनि, नंदकुमार बिडवई यांना कळविली असता त्यांनी सदर ठिकाणी स्टाफला रवाना करुन तडीपार इसम मिळुन येतो अगर कसे? मिळुन येताच त्यास ताब्यात घेवुन कायदेशीर कारवाई करण्याचे आदेश दिले होते.

सदर बातमीची स्टाफची खातरजमा झाल्याने स्टाफने वरील ठिकाणी जावुन खात्री केली असता वरील नमुद वर्णनाचा इसम मिळुन आल्याने त्यास ताब्यात घेवुन त्यास त्याचे नाव, पत्ता विचारता त्याने त्याचे नाव, पत्ता **गौरव संभाजी काकडे, वय-३२ वर्षे, रा. सोमेश्वर वाडी, विठ्ठल मंदीराशेजारी, पाषाण, पुणे** असे सांगितले. ताब्यात घेण्यात आलेल्या तडीपार इसमास पुणे शहरामध्ये येण्यासाठी कोणत्या पोलीस अधिकारी किंवा मा.न्यायालयाची पुर्व परवानगी घेतली आहे का? याबाबत विचारणा केली असता त्याने मी कोणत्याही पोलीस अधिकारी व संबधित न्यायालयाची पुर्व परवानगी घेतली नसल्याचे सांगुन, तसेच त्यास पुणे शहर पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रात येण्याचे कारण विचारता तो उडवाउडवीची व असमाधानकारक उत्तरे देवु लागल्याने त्याबाबत स्टाफने चतुश्रुंगी पोलीस स्टेशन कडील सदर इसमाचा तडीपार केलेला आदेश प्राप्त करून घेवुन तशी स्टाफची खात्री झाल्याने सदर तडीपार इसमाविरुध्द चतुश्रुंगी पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजि नं ९२८/२०२४, महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम १४२ अन्वये गुन्हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई पुणे शहरचे सदरची कारवाई पुणे शहरचे मा.पोलीस आयुक्त, पुणे शहर, श्री. अमितेश कुमार, मा.पोलीस सह आयुक्त, पुणे श्री.रंजनकुमार शर्मा,मा.अपर पोलीस आयुक्त (गुन्हे),श्री. शैलेश बलकवडे, मा.पोलीस उप आयुक्त (गुन्हे),श्री.निखिल पिंगळे,मा.सहा.पोलीस आयुक्त(गुन्हे-१) श्री.गणेश इंगळे,दरोडा व वाहन चोरी विरोधी पथक १ चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. नंदकुमार बिडवई,यांचे मार्गदर्शनाखाली सहा.पोलीस निरीक्षक प्रविण काळुखे,पोलीस उप निरीक्षक, शाहीद शेख, पोलीस अंमलदार गणेश ढगे, प्रदीप राठोड, अजित शिंदे, महेश पाटील, साईकुमार कारके, अमित गद्रे यांनी केली आहे.